# महिला व बाल विकास विभाग जिल्हा परिषद धाराशिव
# जुनी जिल्हा परिषद धाराशिव - 413501"

जा.क्र.जिपधा/मबावि/आस्था-१/कावि- ९८०/२०२४ दिनांक :- १३.०६.२०२४

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------

**विषयः-** जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत सरळसेवा पदभरती प्रक्रीया २०२३ कागदपत्र पडताळणीसाठी दिनांक १९.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहाणेबाबत.

**संदर्भः-**१) जिल्हा परिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन २०२३ साठी जाहिरात क्रमांक १/२०२३ दिनांक ०५/०८/२०२३

२) अंगणवाडी पर्यवेक्षिका या पदासाठी IBPS मुंबई यांचेकडील online परिक्षेतील प्राप्त निकाल

उपरोक्त विषयी जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-२०२३ साठी जाहीरात क्रमांक-०१/२०२३, दिनांक ०५/०८/२०२३ च्या अनुषंगाने IBPS कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका या पदाच्या online परिक्षेमधिल प्राप्त निकालानुसार पात्र गुणवत्ताधारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०६.०६.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अंगणवाडी पर्यवेक्षिका पदासाठी जाहीरातीमधिल नमूद प्रवर्गातील रिक्त पद भरणेसाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.०६.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अंगणवाडी पर्यवेक्षिका संवर्गातील भरावयाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिरातीमधिल नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी **दिनांक १९.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** कै. यशवंतराव चव्हाण, जिल्हा परिषद सभागृह धाराशिव येथे करण्यात येणार आहे.

सबब याद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपले मूळ शैक्षणिक व इतर आवश्यक अभिलेखे तसेच जाहिरातीमधीलल नमूद आवश्यक कागदपत्रासह पडताळणीसाठी आपण **दिनांक १९.०६.२०२४** रोजी वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांचा कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणाताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सोबतः-** कागदपत्र पडताळणीसाठी घेवून यावयाच्या कागदपत्राची यादी

(डी.एम.गिरी)
जिल्हा कार्यक्रम अधिकारी (वाकवि)
तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with CamScanner

## जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती – २०२३
## या कार्यालयाचे प्रसिध्द करण्यात आलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका पदासाठी उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी

| अ.क्रं. | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नान क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधिल मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र,पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुस्तक) |

(डी.एम.गिरी)
जिल्हा कार्यक्रम अधिकारी (वाकवि)
तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with CamScanner